**विशेष लेख क्र.९१**

५ आषाढ १९२९ शके (सायं. ५.३०)
मंगळवार, दि.२६ जून २००७

## बालसुधार गृहातील मुलगा होणार स्वावलंबी

**महिला व बाल विकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या संस्थांमधील मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देण्याचा निर्णय नुकताच शासनाने घेतला आहे. बाल सुधारगृहातून बाहेर पडलेल्या मुलांना स्वावलंबी बनविणारा हा निर्णय असल्याकारणाने याचे मोठ्या प्रमाणावर स्वागत करायला हवे.**

महिला व बालविकास विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या निरनिराळ्या संस्थांमधील मुलांचा निरीक्षण गृहातील वास्तव्याचा कालावधी सात दिवसापासून सहा महिन्यापर्यंतचा असतो. अशी मुले याठिकाणी विविध कारणानिमित्ताने आलेली असतात. इतर संस्थांमधील मुले तुलनेने दीर्घ कालावधीसाठी संस्थेत वास्तव्यास असू शकतात. महाराष्ट्र राज्यात काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांकरिता ५१९ संस्था तर, विधी संघर्षग्रस्त मुलांकरिता ६० संस्था कार्यरत आहेत. या सर्व ५७९ संस्थांमध्ये ३४,४९६ इतकी मुले प्रवेशित आहेत.

सध्या प्रायोगिक तत्त्वावर यातील ६० निरीक्षणगृहे, ३ विशेषगृहे, ४ अनुरक्षणगृहे, ३१ शासकीय बालगृहे आणि दोन शासकीय संरक्षणगृहे अशा एकूण १०० संस्थांमधील सुमारे ९ हजार मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा निर्णय झालेला आहे. मुलांचा कल, शिक्षण व क्षमता लक्षात घेऊन त्यांच्याकरिता प्रशिक्षण अभ्यासक्रमाची निवड जवळची संस्था व प्रशिक्षण संस्था करणार आहे. २० मुलांचा एक गट तयार करुन निवासी संस्था व प्रशिक्षण देणारी संस्था यांच्याशी समन्वय साधून ही योजना राबविली जाणार आहे. यासाठी एका मुलासाठी प्रत्येक महिन्याला प्रशिक्षणाचा खर्च ५०० रुपया पर्यंत अपेक्षित आहे.

एकाच प्रकारचे प्रशिक्षण घेऊन सर्व मुलांचे पुनर्वसन होईलच असे नाही. नोकरी किंवा व्यवसाय मिळविण्याच्यादृष्टीने त्यांना एकापेक्षा अधिक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याचे या योजनेद्वारे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. त्यामुळे एका मुलास वास्तव्य काळात एकापेक्षा अधिक प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याकरिता प्रती प्रशिक्षणाच्या अपेक्षित खर्चाची मर्यादा ५ हजार रुपये इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. म्हणजेच एका मुलावर त्याच्या वास्तव्य काळात ५ हजाराचा प्रशिक्षणाचा खर्च करण्यात येऊन त्यांस एकापेक्षा अनेक कोर्सेसचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे ही मुले व्यवसाय प्रशिक्षणात पारंगत होऊन सक्षम होणार आहेत. त्यानंतर ही मुले ज्यावेळी सुधारगृहातून बाहेर येतील आणि समाजात एकरुप होतील त्यावेळेस त्यांच्या जवळ समाजात ताठ मानेनं वावरण्याचा आत्मविश्वास असेल. अशाप्रकारे शासन सामाजिक बांधिलकीने कामे करीत असून राज्य शासनाच्या या समाजोपयोगी निर्णयामुळे अशा मुलांचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

**डी.आर.गाडे**

०००